# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 August 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- देशात धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याची गरज–७८ व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात पंतप्रधानांचं प्रतिपादन–
- मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते ध्वजारोहण–मराठवाड्यात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत आतापर्यंत ८० लाखापेक्षा जास्त महिलांना लाभ प्राप्त

आणि

- देशातील सार्वजनिक विद्यापीठांच्या यादीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ४६ वा क्रमांक

****

देशात धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याची गरज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. आज ७८ व्या स्वातंत्र्यदिनी नवी दिल्लीत ऐतिहासिक लाल किल्ल्याच्या तटबंदीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते सलग ११ व्या वेळेस ध्वजारोहण करण्यात आलं. त्यानंतर केलेल्या भाषणात पंतप्रधानांनी, ४० कोटी नागरिक जर जुलमी ब्रिटीश सत्ता उलथवून टाकत स्वातंत्र्यप्राप्तीचं उद्दीष्ट साध्य करू शकतात, तर १४० कोटी नागरिक २०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न नक्कीच साकार करू शकतात, असा विश्वास व्यक्त केला. धर्माच्या आधारावर देशात दोन गट पाडणाऱ्या कायद्यांना आधुनिक युगात स्थान नसल्याचं, मोदी यांनी नमूद केलं. ते म्हणाले –

***इस गंभीर विषय पर देश में चर्चा हो। जो कानून धर्म के आधार पर देश को बांटते है, जो उंच नीच का कारण बन जाते है, ऐसे कानुनों को आधुनिक समाज मे कोई स्थान नही हो सकता। अब समय की मांग है, की देश मे एक सेक्युलर सिविल कोड हो। हमने कम्युनल सिविल कोड मे पचहत्तर साल बिताये है। अब हमें सेक्युलर सिविल कोड की तरफ जाना होगा। और तब जा कर के देश मे धर्म के आधार पर जो भेदभाव हो रहे है, सामान्य नागरिक को जो दुरी महसूस होती है, उससे हमें मुक्ती मिलेगी।***

जातीयवाद तसंच परिवारवादापासून मुक्ततेसाठी राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या एक लाख नवतरुणांना राजकारणात सक्रीय करण्याचा मानस पंतप्रधानांनी यावेळी व्यक्त केला. वन नेशन वन इलेक्शनच्या मुद्याचा त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला. बांग्लादेशातली परिस्थिती लवकरच निवळेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. महिला सुरक्षा आणि सक्षमीकरण, शिक्षण, युवक कल्याण, संरक्षण साहित्यनिर्मिती, आदी विषयांवरही पंतप्रधानांनी भाष्य केलं.

****

राज्यात ७८ वा स्वातंत्र्यदिन सर्वत्र उत्साहात साजरा झाला. मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मंत्रालयात ध्वजारोहण करण्यात आलं. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुण्यात विधान भवन इथं ध्वजारोहण करण्यात आलं. मराठवाड्यातही ध्वजारोहणासह विविध कार्यक्रमांनी स्वातंत्रदिन साजरा झाला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं विभागीय आयुक्त कार्यालयात मुख्य ध्वजारोहण सोहळा पार पडला. राज्याचे अल्पसंख्यांक विकास, औकाफ आणि पणन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. याप्रसंगी विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

यावेळी केलेल्या भाषणात सत्तार म्हणाले…

***मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण आपल्या जिल्ह्यात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आपल्या जिल्ह्यात ५ लाख ३२ हजार ७६९ इतक्या बहिणींचे नाव या याजनेच्या नावासाठी मंजूर झाले असून राज्यात आपला जिल्हा हा सर्वत्र अग्रेसर आहे. छत्रपती संभाजीनगर इथे अल्पसंख्याक आयुक्तालयाची स्थापना करून कार्यान्वित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे अल्पसंख्याक समाजाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासाला चालना मिळणार आहे. परवा झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मराठवाड्याचा हिताचे निर्णय घेतले आहेत.***

****

जालना इथं जिहाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते झालं. यावेळी पालकांमंत्र्यांनी जिल्हावासियांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्यासह शासकीय अधिकारी कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिक तसंच गणमान्य नागरिक यावेळी उपस्थित होते.

****

बीड इथं राज्याचे कृषी मंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी मुंडे यांनी यावेळी जिल्ह्यात कृषी क्षेत्रात राबवलेल्या विविध योजनांचा आढावा घेतला.

***बीड जिल्ह्यात २०२३–२४ च्या खरीप व रब्बी हंगामात मिळून चारशे कोटी चोवीस लाख रूपये पीक विमा मंजूर करण्यात आला. यापैकी आत्तापर्यंत सुमारे तीनशे एकोणऐंशी कोटी रूपयांचं वितरण शेतकऱ्यांना करण्यात आलं असून उर्वरित एकेवीस कोटी रूपये वितरीत करणे सुरू आहे. याशिवाय विमा कंपनीने कोणतेही कारण न देता नाकारलेला विमा प्रस्ताव मंजूर करून त्याही शेतकऱ्यांना येत्या काही दिवसांत पीक विमा मिळणार आहे.***

****

नांदेड इथं जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. जिल्ह्यात विविध संस्था, संघटनांच्या वतीनं रक्तदान शिबिरं, सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर कार्यक्रमांच्या माध्यमातून स्वातंत्र्यदिन साजरा झाला.

****

लातूर इथं जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आलं. याप्रसंगी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी केलेल्या भाषणात बनसोडे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, यासह विविध योजनांचा आढावा मांडला.

****

धाराशिव इथे आरोग्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉक्टर तानाजी सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. त्यापूर्वी पालकमंत्र्यांनी हुतात्मा स्मृतीस स्तंभाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं, जिल्ह्यातील नागरिकांना स्वतंत्रता दिनाच्या शुभेच्छा दिल्या. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी सुरू असलेल्या विविध योजनांचा त्यांनी आपल्या भाषणातून आढावा घेतला.

***जिल्ह्यात २०२३–२४ या वर्षात महा रोहयोच्या कामातून बावीस लक्ष पाच हजार चारशे शहात्तर मनुष्य दिवस निर्मिती केली आहे. बेचाळीस हजार चारशे सहा कुटुंबांनी कामे केली. सहा हजार सातशे सहा कुटुंबांनी शंभर दिवसांपेक्षा जास्त दिवस मनरेगाची कामे केली. सध्या जिल्ह्यात मनरेगाची चोवीस आठशे चौरेचाळीस कामे सुरू आहेत.***

****

हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी आमदार तान्हाजी मुटकुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

परभणी इथं मुख्य शासकीय ध्वजरोहणाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्याहस्ते साजरा झाला. यावेळी आमदार डॉ. राहुल पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर,

जिल्हा पोलीस अधीक्षक रविद्रसिंह परदेशी, मनपा आयुक्त तृप्ती सांडभोर, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉ विजय फुलारी यांच्याहस्ते, नांदेड इथं स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉ मनोहर चासकर यांच्या हस्ते तर परभणी इथल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात कुलगुरू डॉक्टर इंद्रमणी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. मराठवाड्यात इतरत्र सर्व शैक्षणिक संस्था, सामाजित संघटना तसंच शासकीय कार्यालयांमधून ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहास साजरा झाला.

****

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या पहिल्या हप्त्याचा लाभ देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आतापर्यंत ८० लाखापेक्षा अधिक पात्र महिलांना लाभ मिळाल्याची माहिती, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली आहे. त्या आज मुंबईत बोलत होत्या. उर्वरित पात्र महिलांना सुद्धा १७ ऑगस्ट पर्यत हा  लाभ मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या योजनेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, १४ ऑगस्टपर्यत १ कोटी ६२ लाखांपेक्षा अधिक महिलांनी या योजनेत नोंदणी केल्याची माहिती त्यांनी दिली.

****

नॅशनल इन्स्टिटयूशनल रँकिंगने जाहीर केलेल्या यादीनुसार देशातील सार्वजनिक विद्यापीठात डॉ.  बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठानं देशात ४६ वा तर राज्यात ४ था क्रमांक मिळवला आहे. या बद्दल कुलगुरु डॉक्टर विजय फुलारी यांनी आज प्राध्यापक, अधिकारी-कर्मचाऱ्यांचं अभिनंदन केलं. आज विद्यापीठात ध्वजारोहणानंतर ते बोलत होते. विद्यापीठातील विविध विभाग प्रमुख, अधिकारी कर्मचारी आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

****

परभणी इथं लायन्स क्लबच्या वतीनं एक हजार फुट लांबीच्या राष्ट्रध्वजाची फेरी आणि राष्ट्रध्वज सन्मान पथदर्शन करण्यात आलं. गांधी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मार्गावरून काढलेल्या या फेरीत शहरातील ५० शाळेतल्या सुमारे पाच हजारांवर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

****

जालना पोलिस मुख्यालयातल्या कवायत मैदानाचं नूतनीकरण तसंच विद्युत पथदिवे या कामाचं लोकार्पण राज्याचे गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते आज करण्यात आलं. दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत उत्कृष्ट काम केल्याबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बी एम थोरात यांचा आज धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तानाजी सावंत यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

****

देशाचं भवितव्य उज्ज्वल करण्याचं काम ग्रंथालयानं करावं असं आवाहन कृषिमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे. ते आज बीड इथं शासकीय ग्रंथालयाच्या भूमिपूजन प्रसंगी बोलत होते. या ग्रंथालयात पुस्तकांसह डिजिटल पद्धतीनंही ग्रंथसंपदा उपलब्ध राहणार आहे आणि अशा स्वरूपाचं हे राज्यातलं चौथं डिजिटल ग्रंथालय असल्याचं मुंडे यांनी सांगितलं

****

वाशिम जिल्ह्यात आज सकाळी समृद्धी महामार्गावर नागपूरहून मुंबईकडे जाणाऱ्या एका भरधाव कारनं रस्त्याच्या बाजूला उभ्या ट्रकला धडक दिली. यात दोघांचा मृत्यू झाला. तर तीन जण जखमी झाले.

****